सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक : विकाअ/शिक्षण/२०२३/ ३४९
दिनांक 02 FEB 2023

प्रति,
प्राचार्य,
सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी,
अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग,अमरावती.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदवी /पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेकरिता गुणवत्ता यादी ऑनलाईन सबमिट करण्याबाबत...**
**संदर्भ :** सहा.संचालक,तंत्रशिक्षण,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०२३/२४ दिनांक २ फेंब्रुवारी २०२३

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांचे गुणवत्ता यादीची तपासणी आपणामार्फत सबंधित तपासणी अधिकारी यांच्याकडून करण्यात आलेली आहेत. म्हणजेच तपासणीचे काम पुर्ण झालेले आहे. तथापी ब-याचश्या संस्थांनी तपासणी केलेल्या गुणवत्ता याद्या या कार्यालयाव्दारे प्रमाणित करण्याकरीता अद्यापपर्यंत या कार्यालयास सादर केलेल्या नाही.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, ज्या संस्थांनी गुणवत्ता याद्या प्रमाणित करण्याकरीता अजुनपर्यंत या कार्यालयास सादर केलेल्या नाहीत अश्या संस्थांनी कोणत्याही परिस्थितीत दिनांक ६|/२/२०२३ पर्यंत सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत या कार्यालयास सादर कराव्यात. जेणेकरुन आपणांस संबंधित प्राधिकरणास प्रमाणित केलेल्या गुणवत्ता याद्या सादर करणे शक्य होईल. आपण वरील मुदतीच्या आत गुणवत्ता याद्या या कार्यालयास सादर न केल्यामुळे भविष्यात विद्यार्थ्यांचे प्रवेशाबाबत काही नुकसान झाल्यास हे कार्यालय जबाबदार न राहता त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील, याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

**प्र.सहसंचालक**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

**प्रतः प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय अमरावती यांना ईमेल करण्यासाठी.